# ई - पोलीस पत्रिका

दि २२/१२/२०२२          अनु.क्र. २३५

## (अमरावती शहर पोलीसांची २०२२ ची उद्दिष्टे)

- **नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.**
- **उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीस दल.**
- **महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.**
- **जातीय सलोखा वाढविणे.**
- **संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्ध कठोर कारवाई.**
- **रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.**
- **पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.**
- **आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.**
- **"सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू.**

## भाग-१

## नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

**१. पोआअ/लेखा/घबाअ-कागदपत्र/१५०१६ /२०२२ अमरावती शहर दिनांक २२/१२/२०२२**

**सदंर्भ :-** १.शा.नि वित्त विभाग क्र.अग्रीम-१०९५/प्र.क्र.७०/९५/विनीयम दि.२६.०९.१९९७
२.शा.नि.क्र.घबाअं-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/विनीयम दि.२०.०२.२०१५
३.शा.नि.क्र-घबाअं-२०१९/प्र.क्र.१४/२०१९/विनीयम दि.०२.०२.२०२१

**विषय : मंजूर झालेल्या घरबांधणी अग्रीमाची विनीयोजन केल्याबाबतची कागदपत्रे सादर करणेबाबत.**

--००० --

उपरोक्त संदर्भाकीत विषयान्वये पोलीस आयुक्त कार्यालय अमरावती शहर आस्थापनेवर कार्यरत खालीलप्रमाणे नमुद पोलीस अधिकारी/अंमलदार वित्तीय **वर्ष २०१५-२०१६ व २०१६-२०१७** मध्ये त्यांचे नावासमोर दर्शिविल्याप्रमाणे घरबांधणी अग्रीम मंजुर करण्यात आले होते सदर अग्रीम विनीयोजनाबाबत आवश्यक कागदपत्रे विहीत कालावधीत सादर न केल्याने त्यांचे वेतनातुन संदर्भीय शासन निर्णयानुसार दंडनीय व्याजासह कपात सुरु करण्यात आली होती.तथापी खालीलप्रमाणे नमुद पोलीस अंमलदार यांनी सदर घरबांधणी अग्रीम विनीयोजनाबाबत मुळ गहाणखत या कार्यालयास सादर केले असुन इतर कागदपत्रे सादर करणेबाबत कालावधी मिळणेकरीता तसेच वेतनातुन सुरु असलेली दंडनीय कपात बंद करणेबाबत या कार्यालयास विनंती केली असुन त्यांचे विनंती नुसार वेतनातुन सुरु असलेली दंडनीय कपात तात्पुरत्या स्वरुपात बंद करावी.

| अ.क्र. | कर्मचारी यांचे नाव व पदनाम | मंजुर घरबांधणी अग्रीम |
|---|---|---|
| १) | पोना/१२९८ देवेंद्र कोठेकर, गुन्हे शाखा | रु.१५,००,०००/- |
| २) | पोहवा/८४९ छगन विठ्ठल कडु, पो.मु | रु.७०,००,००/- |
| ३) | पोहवा/१७४८ सतिश पांडुरंग हिवे, पो.मु | रु.१४,००,०००/- |
| ४) | पोहवा/१२४० ओम भालेराव, श.वा.शा | रु.२०,००,०००/- |
| ५) | पोहवा/१२२६ सुधीर घुरडे, पो.मु | रु. ८,००,०००/- |
| ६) | पोहवा/५८४ अजय आमले, पो.स्टे बडनेरा | रु.८,००,०००/- |

वरील नमुद पोलीस अंमलदार यांना सुचीत करण्यात येते की, या कार्यालयाचे दि.०४.११.२०२२ चे नोटीस मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार इतर कागदपत्रे (७/१२ नमुना बोजासह,घरखरेदीचे खरेदीखत, शासकिय विमा संचलनालय यांचेकडील विमा, वारसाचे संमतीपत्र इ.) कागदपत्रे सादर करणेकरीता आपणास ०१ महिन्याचा कालावधी देण्यात येत असुन सदर कागदपत्रे विहीत कालावधीत सादर न केल्यास शासन निर्णय वित्त विभाग दि.२०.०२.२०१५ व दि.०२.०२.२०२१ मध्ये नमुद नियमानुसार आपले वेतनातून सुरु करण्यात आलेली दंडनीय कपात पुर्ववत सुरु करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**२. पोआअ/लेखा/घबाअ-व्याजवसुली/१४८५० /२०२२ अमरावती शहर दिनांक १५/१२/२०२२**

**संदर्भ :-** शानि.वित्त विभाग क्र.घबाअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/विनियम दि.२०.०२.२०१५

**विषय :-** घर बांधणी अग्रीमावरील व्याज वसुलीबाबत.

---oooo---

उपरोकत संदर्भाकित विषयान्वये खालीलप्रमाणे नमूद पोलीस यांचा विनंती अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला असुन त्यानुसार त्यांना मंजूर करण्यात आलेल्या घरबांधणी अग्रीमाच्या मुददलाची कपात पुर्ण झाली असून त्यावरील व्याजाची रक्कम परिगणना करून वेतनातून वसुल होणेबाबत विनंती केली आहे.

| अ.क्र | पोलीस अमलदार यांचे नाव व पदनाम | घ.बा.अ वरील व्याज | कपात करावयाचे हफते शा.नि.२०.०२.१५ | कपात सुरु करावयाचा महिना |
|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **४** | **५** | **६** |
| १. | पोहवा/८४२ संजय बाबुरावजी मिल्खे, नेमणुक पो.स्टे खोलापुरी गेट | रू.१,४४,६११/- (अक्षरी रू.एक लाख चौरेचाळीस हजार सहाशे अकरा) | ४२५३ x ३३<br>४२६२ x ०१ | डिसेंबर-२०२२ |

तरी मा.महालेखाकार यांचे आक्षेपाचे तसेच अतिरीक्त रक्कम भरण्याचे अधिन राहून वरीलप्रमाणे नमूद पोलीस अमलदार यांचे कडील शिल्लक घरबांधणी अग्रीमाचे व्याजाची परिगणना करण्यात आली असून त्यांचे माहे १२/२०२२ चे वेतनातून सदरची कपात सुरु करावी. तथापी वरील नमूद पोलीस अमलदार सेवानिवृत्त/स्वेच्छासेवानिवृत्त/सक्तीने सेवानिवृत्त झाल्यास व व्याजाची रक्कम शिल्लक राहील्यास शानि.वित्त विभाग क्र. घबाअ - २०१२/प्र.क्र.३०/२०१२/ विनियम दि.२०.०२.२०१५ व क्र. घबाअ-२०१९/प्र.क्र.१४/२०१९/ विनीयम दि.०२.०२.२०२१ मधील नियम क्र. ७ अन्वये व्याजाची रक्कम त्यांचे सेवानिवृत्ती उपदानातून वसुल करण्यात यावी.

**३. पोआअ/लेखा/घबाअ-व्याजवसुली/१४७१४/२०२२ अमरावती शहर दिनांक १२/१२/२०२२**

**सदर्भ :-** १.शा.नि वित्त विभाग क्र.अग्रीम-१०९५/प्र.क्र.७०/९५/विनीयम दि.२६.०९.१९९७
२.शा.नि.क्र.घबाअं-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/विनीयम दि.२०.०२.२०१५
३.शा.नि.क्र-घबाअं-२०१९/प्र.क्र.१४/२०१९/विनीयम दि.०२.०२.२०२१
४.क्र.पोआअ/लेखा/घबाअ-कागदपत्रे/६१९३/२०२२/ दि.०३.०६.२०२२
५. क्र.पोआअ/लेखा/घबाअ-कागदपत्रे/१०१६५/२०२२/ दि.१९.०७.२०२२
६. क्र.पोआअ/लेखा/घबाअ-कागदपत्रे/१२०४१/२०२२/ दि.२१.०९.२०२२
७. क्र.पोआअ/लेखा/घबाअ-कागदपत्रे/१३४३६/२०२२/ दि.०४.११.२०२२
८. आपला विनंती अर्ज दि.०१.१२.२०२२ व दि.०६.१२.२०२२

**विषय :** मंजूर झालेल्या घरबांधणी अग्रीमाची विनीयोजन केल्याबाबतची कागदपत्रे सादर करणेबाबत.
पोहवा/१२२६ सुधीर पंजाबराव घुरडे, नेमणुक पोलीस मुख्यालय अमरावती शहर.

--०००--

उपरोक्त संदर्भाकीत विषयान्वये आपण या कार्यालयास सादर केलेल्या विंनंती अर्जाचे अनुषंगाने आपणास वित्तीय **वर्ष २०१६-२०१७** मध्ये तयार घर खरेदी करीता मंजुर करण्यात आलेले घरबांधणी अग्रीम रू.८,००,०००/- (आठ लाख फक्त) चे विनीयोजनाबाबत गहाणखत तयार करून या कार्यालयास आपण दि.०१.१२.२०२२ रोजी सादर केले असुन या कार्यालयाचे संदर्भ क्र.०४ ते ०६ चे नोटीस मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार इतर कागदपत्रे (७/१२ नमुना बोजसह, घरखरेदीचे खरेदीखत, शासकिय विमा संचलनालय यांचेकडील विमा, वारसाचे संमतीपत्र इ.) अदयापावेतो सादर केलेली नाही. त्यामुळे आपणास मंजुर करण्यात आलेल्या घरबांधणी अग्रीम रकमेच्या विनीयोजनासंबधी कागदपत्राची पूर्तता अदयापावेतो आपण केलेली नाही.

शासन निर्णय वित्त विभाग दि.२०.०२.२०१५ व दि.०२.०२.२०२१ मध्ये नमुद नियमानुसार आपणास मंजुर करण्यात आलेल्या घरबांधणी अग्रीम रकमेचे विहीत कागदपत्रे **१) घर खरेदीचे नोंदणीकृत खरेदीखत २)७/१२ नमुना बोजासह ३)शासकिय विमा संचलनालय यांचेकडील विमा ४. वारसाचे ना-हरकत प्रमाणपत्र इ.** कागदपत्रे सादर केल्यानंतरच आपले वेतनातून सुरु करण्यात आलेली दंडनीय कपात बंद करण्याबाबत कार्यवाहीचा निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**४. पोआअ/विचौ-१/गै.कसुरी/अं.आ./पोहवा/११५२ रामटेके/१४८०९/२०२२ अमरावती शहर दिनांक १३/१२/२०२२**

**कसुरदाराचे नाव :-** पोहवा/११५२ विनायक रामटेके, नेमणूक - पो.स्टे. गाडगेनगर, अमरावती शहर

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही पोहवा/११५२ विनायक रामटेके, नेमणूक - पो.स्टे. गाडगेनगर, अम. शहर येथे नेमणुकीस असतांना मा. जिल्हा न्यायालय, अमरावती येथील कनिष्ठ श्रेणी लिपीक स्वाती गौरव उपाध्याय हया दिनांक १३/१२/२०२१ रोजी कोर्टाचे नियमित कामकाज करीत असतांना त्यांचेसोबत असभ्यतेचे वर्तन केले. याबाबत त्यांनी कोर्टाचे अभियोक्ता जामनेकर मॅडम यांचे सोबत पो.स्टे. गाडगेनगर येथे येवून तुमचे विरुध्द लेखी तक्रार दिली. सदर प्रकरणाची चौकशी केली असता असे निष्पन्न होते की, दिनांक १३/१२/२०२१ रोजी कोर्ट क्र. १० जे.एम.एफ.सी. अमरावती येथे शिपाई हजर नसल्याने कनिष्ठ लिपीक श्रीमती स्वाती उपाध्याय यांनी निकाली काढावयाचे प्रकरणाचे गठठे नविन बिल्डींग मध्ये घेवून जायचे असल्याचे सांगीतल्याने तुम्ही गठठा घेवून श्रीमती स्वाती उपाध्याय सोबत लिफट ने जात असतांना तुम्ही गठठा खाली ठेवून स्वाती हिच्या हाताला धक्का लावून एक पप्पी देते का असे म्हटले. असे प्राथमिक चौकशी मध्ये निष्पन्न झाले आहे. अशा प्रकारे तुम्ही शिस्तप्रिय पोलीस विभागात कार्यरत असून देखील

कर्तव्याचे व जबाबदारीचे भान न ठेवता गैरवर्तन केल्याने पोलीस विभागाची प्रतिमा जनसामान्य मानसामध्ये मलीन झाली आहे.

तुमच्या अशा बेजबाबदारपणाचे, गैरवर्तनाचे कसूरी बद्यल तुम्हांस मुंबई पोलीस (शिक्षा व अपील ) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार **रु.५०००/- दंडाची शिक्षा का करण्यात येवु नये म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.** सदरची नोटीस तुम्ही स्विकारुन देखील त्यावर आपले स्पष्टीकरण सादर केले नाही. यावरुन तुम्हास नमुद कसुरा बाबत कारणे दाखवा नोटीसमध्ये प्रस्तावित केलेली शिक्षा मान्य असुन त्या बाबत तुम्हास काहीही सांगायचे नाही. असे गृहीत धरुन खालील प्रमाणे नमुद शिक्षेचे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

उपरोक्त कसुरी प्रकरणी मी डॉ.आरती सिंह पोलीस आयुक्त, अमरावती शहर सक्षम अधिकारी याव्दारे पोहवा/११५२ विनायक रामटेके, नेमणूक - पो.स्टे. गाडगेनगर, अमरावती शहर यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ पोटनियम (२) मधील (४) च्या तरतुदी नुसार ५०००/- **रुपये आर्थिक दंडाचे** शिक्षेबाबतचे अंतीम आदेश निर्गमीत करण्यांत येत आहे.

उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यथित होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा. अपर मुख्य सचिव, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई यांना यथायोग्य मार्फतीने अपिल अर्ज सादर करु शकता.

**५. पोआअ/पशा-३/परावर्तीत रजा मंजुरी/१४८९१ /२०२२ अमरावती शहर दिनांक १३/१२/२०२२**

# आदेश

पोलीस आयुक्त, अमरावती शहर या घटकातील खालील नमुद मंत्रालयीन कर्मचारी हे त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे त्यांची महाराष्ट्र नागरी सेवा, रजा नियम १९८१ मधील नियम क्रमाक ५० व ६१ अन्वये **अर्जित रजा /परावर्तीत रजा** मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव/पदनाम | नेमणुक | रुग्ण निवेदनाचा कालावधी |
|---|---|---|---|
| १ | श्री.आशिष बिरोले,कश्रेलि | आस्थापाना शाखा | दि.२९/११/२०२२ ते दि.०६/१२/२०२२ एकुण ०८ दिवस **अर्जित रजा** मंजुर |
| २ | श्रीमती रोशणी पासरे, पुर्ण कालीन सफाई कामगार | पो.मुख्यालय | दि.२६/११/२०२२ ते दि.०३/१२/२०२२ एकुण ०७ दिवस **परावर्तीत रजा** मंजुर |

**६. पोआअ/पशा-३/अर्जित रजा मंजुरी/१४८९० /२०२२ अमरावती शहर दिनांक १५/१२/२०२२**

पोलीस आयुक्त, अमरावती शहर या घटकातील खालील नमुद मंत्रालयीन कर्मचारी हे त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे त्यांची महाराष्ट्र नागरी सेवा, रजा नियम १९८१ मधील नियम क्रमाक ५० **अर्जित रजा** मंजुर करण्यात येत आहे.

## आदेश

| अ.क्र. | नाव/पदनाम | नेमणुक | अर्जित रजा कालावधी |
|---|---|---|---|
| १ | श्री.ज्ञानेश्वर वावरकर, कनिष्ठ तज्ञ | अंगुली मुद्रा, शाखा | दि.२६/१२/२०२२ ते दि.३०/१२/२०२२ एकुण ०५ दिवस, दि.२४/१२/२०२२ व दि.२५/१२/२०२२ मागील ३१/१२/२०२२ पुढील शनि.रवि.शा.सु. जोडुन |

**(किशोर शेंडे)**
प्रशासकीय अधिकारी
पोलीस आयुक्त, अमरावती शहर करीता

प्रति,

पत्रव्यहार शाखा / सेवापट नोंदणी लिपीक / सीसीटीएनएस